कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२६-२७/१६६३
दि:२१/१०/२६

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागात विविध अभ्यासक्रमासाठी कलेची ओढ असलेल्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशअर्ज मागविण्यात येत आहेत. सदर प्रवेशअर्ज २०२७ च्या शैक्षणिक वर्षासाठी असतील.

या अभ्यासक्रमात भारतीय संगीतांतर्गत शास्त्रीय गायन, हार्मोनियमवादन तसेच तबला, सितार, भरतनाट्यम् व कथ्यकनृत्य इत्यादि प्रकारांचे विशेष प्रशिक्षण दिले जाईल. या सर्व अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी वयोमर्यादा किमान १० वर्षे अशी राहील. ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वयाची १० वर्षे पूर्ण केलेल्यांनीच सदर अभ्यासक्रमांसाठी अर्ज करावेत. कमाल वय ३५ राहील.

इच्छुकांना प्रवेशासाठीचा अर्ज व माहीतीपत्रक दि. २६ ऑक्टोंबर ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत सकाळी १०.०० ते १.०० व दुपारी २.०० ते ४.०० वाजेपर्यंत कला अकादमीच्या लेखा विभागातून (Cash Counter) मिळवता येईल. इच्छुकांनी आपले पूर्ण भरलेले अर्ज दि. २० नोव्हेंबर २०२६ संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत जन्मदाखल्यासह कला अकादमी गोवा, कंपाल, पणजी या पत्यावर समक्ष सादर करावे. अंतिम मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरील विषयासाठी निवडचाचणी खालील प्रमाणे घेण्यात येईल दि. २७ नोव्हेंबर २०२६ (दुपारी २.३० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत) व दि. २८ नोव्हेंबर २०२६ (सकाळी १०.०० ते दुपारी १.००) आणि (दुपारी २.३० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत) कला अकादमी गोवा, कंपाल पणजी येथे निवड चाचणी होणार आहे यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

तसेच कला अकादमीच्या पेडणे, वाळपई, साखळी, काणकोण, केपे व सांगे येथील संगीत केंद्रात शास्त्रीय गायन, तबला व हार्मोनियम वादनाचे प्रशिक्षण दिले जाते. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी तेथील केंद्र प्रमुखांशी दि. २३ नोव्हेंबर ते २१ डिसेंबर २०२६ या कालावधीत संपर्क साधावा. वरील विषयासाठी निवडचाचणी दि. २२ ते २३ डिसेंबर २०२६ रोजी संबंधित केंद्रांवर घेण्यात येईल. सविस्तर माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी खालील केंद्र प्रमुखांशी संर्पक साधावा.

| केंद्र | केंद्र प्रमुख | मोबाईल |
|---|---|---|
| १. पेडणे | श्री.राजू बर्वे | ९१४५०४२२८३ |
| २. साखळी | श्री.विद्याधर पकळे | ९८२३८६६७४५ |
| ३. वाळपई | श्री.गीतेश गावडे | ८८०६२४९९७४ |
| ४. केपे | श्री.अमित भोसले | ७०८३२२९१५६ |
| ५. सांगे | श्री. प्रजोत देसाई | ८७८८०४४७४३ |
| ६. काणकोण | सौ.नितु महाले | ७८२०९४१६०१ |

(श्री. शंकर बा. गांवकर)
सदस्य सचिव
कला अकादमी गोवा

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)